नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अमरावती कृषि हवामान सल्ला शुक्रवार, दिनांक – ०९ ऑक्टोबर २०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १० ऑक्टोबर २०२० ते १४ ऑक्टोबर २०२०)				
दिनांक	१०/१०	११/१०	१२/१०	१३/१०	१४/१०
पाऊस (मिमी)	३	५	८	८	२०
कमाल तापमान (अं.से.)	३१	३१	३०	३०	२९
किमान तापमान (अं.से.)	२३	२३	२३	२३	२२
वा-याची दिशा	९५	९५	९०	९०	९४
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	७९	८०	८२	८२	८३
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	२	२	२	२	२
वा-याचा वेग (किमी / तास)	६०	५८	७२	११२	७७
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानुसार दिनांक ९ ते १० ऑक्टोबर दरम्यान बहुदा सर्वत्र आणि ११ ते १३ ऑक्टोबर दरम्यान सर्वत्र हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर ९ ते १० दरम्यान एक दोन ठिकाणी विजांचा कडकडाटसह मेघ गर्जनेची आणि ११ ते १३ दरम्यान मुसळधार पाऊस व विजांचा कडकडाटासह मेघ गर्जनेची चेतवानी वर्तविण्यात आली आहे.

पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
सर्व पिक		सर्व पिकात फवारणी करतांना स्तानिक वातावरण व हवेची दिशा पाहून फवारणी करावी. पिकावर किडींचा प्रादुर्भाव पाहून त्याच्या नियंत्रणासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी तसेच फवारणी करतांना खबरदारी म्हणून दिलेल्या सुचनाचे पालन करावे, किटकनाशाके हि विषारी असल्याने त्यांची हाताळणी करतानां सदैव जागरूक राहावे. गळके फवारणी यंत्र न वापरता ते दुरुस्त करून वापरावे. फवारणी करताना संरक्षक कपडे उदा. गॉगल, मोजे, तोंडाला मास्क, डोक्यावर, गमबूट, इत्यादी. वापरावे. किटकनाशक पोटात जाण्याची शक्यता असल्याने फवारणीचे मिश्रण करताना अथवा फवारणीच्या वेळी तंबाखू खाणे अथवा धुम्रपान करणे टाळावे. फवारणीचे काम पूर्ण झाल्यावर हात साबणाने स्वच्छ धुउनच खाणे पिणे करावे. तसेच उपाशीपोटी फवारणी न करता फवारणी पूर्वी न्याहारी करावी. प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस सर्वत्र बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे, व काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे, त्यामुळे ज्याठिकाणी अतिरिक्त पाणी साचेल तेथिल पाणी त्वरित बाहेर काढावे.

कपाशी	फुल पाती/ बोंड	कपाशी पिकात गरज आधारित डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी. सद्यस्थिती होत असलेली कपाशी पिकातील फुलपातीगळ थांबविण्यासाठी अल्फा एन.ए.ए ४.५ टक्के एस.एल ४ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी कपाशी पिकातील बोंड अवस्थ्येत लाल्या वेवेस्थापनसाठी ०१ टक्के युरिया अधिक ०१ टक्के मेग्नेसिअम सल्फेट ची पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशी पिकातील बोंडसड व इतर बुरशीजन्य रोगाच्या नियंत्राणासाठी कार्बेन्डॅझिम ५० डब्लूपी प्रती २० ग्रॅम किंवा क्रेसोझीम-मेथील ४४.३ एससी प्रती १० मि.ली किंवा प्रोपिकॉनाझोल २५ ईसी १० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकात शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून हेक्टरी ४ ते ५ फेरोमेन सापळे लावावी व वेळोवेळी त्यामधील ल्युर बदलावी व त्या सोबतच "टी" आकाराचे १० पक्षी थांबे प्रती एकर उभारावेत. ज्या वेळी ट्रेपमध्ये ८-१० प्रौड पतंग सापडली त्या वेळी त्याच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशी पिकात फुल अवस्थ्येमध्ये शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून कीटकनाशकाची फवारणी करण्या अगोदर किडग्रस्त फुल वेचून नष्ट करावी व जिथे १० टक्के च्या वर नुकसान झाले आहे तिथे प्रोफेनॉफॉस ५० टक्के ईसी @ ३० मि.ली किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी @ २० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यासोबत शेंदरी बोंड अळीचे अंडे वर नियंत्रणासाठी ट्रायकोकार्ड ३ प्रती एकर लावावे. कपाशीवर मावा, तुडतुडे, फुलकिडे व पांढरी माशी या किडींनी आर्थिक नुकसानाची संकेत पातळी गाठताच (१० मावा, २-३ तुडतुडे, १० फुलकिडे, १० पांढरी माशी प्रती पान) पिकावर इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के एसअल २.५ मि.लि किंवा ब्रुप्रोफेजीन २५ टक्के २० मि.लि किंवा थायमेथोक्षम २५ डब्लूजी प्रति २ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.
सोयबीन	परिपक्वता	सोयाबीन परीपक्व झाले आहे, त्यामुळे शेंगा वाळल्या असल्यास, शेंगा फुटण्याअगोदर आपल्या कढील स्तानिक वातावरण पाहून पिक कापून सोगुंन घ्यावे व माल तयार झाल्यावर सुरक्षित ठिकाणी ठेवावा. सोयाबीनची मळणी करताना दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १३-१५ टक्के असावे आणि मळणी यंत्राच्या ड्रमची गती ३५०-४०० फेरे प्रती मिनिट (आर.पी.एम.) या दरम्यान असावी जेणेकरून बियाण्याला इजा पोहोचणार नाही आणि उगवण शक्तीवर परिणाम होणार नाही.
तूर	वाढ	तूर पिकात गरज आधारित डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी. तूर पिकात हेलीकोव्हरपा अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत.
रब्बी ज्वारी	पेरणी	रब्बी पिकामध्ये रब्बी ज्वारी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास पिकेव्ही - क्रांती, या वाणांची निवड करावी. पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यापर्यंत करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. कोरडवाहू रबी ज्वारीकरिता ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद, २५ किलो पालाश प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळीच द्यावी.

रब्बी करडी	पेरणी	रब्बी पिकामध्ये करडी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत केल्यास मावा किडीचा प्रादुर्भाव कमी राहतो व चांगले उत्पादन मिळते. त्याकरिता शिफारसकेल्या भीमा, एकेएस -२०७, पिकेव्ही - पिंक, किंवा नारी -६ या वाणची निवड करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २० ग्रॅम व ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.
जवस	पेरणी	रब्बी पिकामध्ये कोरडवाहु जवस या पिकाचा समावेश करावयचा असल्यास ऑक्टोबरच्या पंधरवाड्यापर्यंत करावी, पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. कोरडवाहू जवस पिकासाठी २५ किलो नत्र व २५ किलो स्फुरद प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्र पेरणीच्या वेळेस द्यावी. जवस पिकात आंतरपीक पद्धतीमध्ये जवस + हरभरा (४:२) किंवा जवस +करडई(४:२) याप्रमाणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे.
हरभरा	पेरणी	रब्बी पिकामध्ये कोरडवाहु हरभरा या पिकाचा समावेश करावयचा असल्यास ऑक्टोबरच्या पंधरवाड्यापर्यंत करावी, त्याकरिता वाण जाकी९२१८, पीडीकेव्ही कांचन, विजय यापैकी कोणताही वाणाची निवड करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबीअम व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. कोरडवाहू हरभरा पिकासाठी २० किलो नत्र, ४० किलो स्फुरद, ४०किलो पालाश प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्र पेरणीच्या वेळेस द्यावी. हरभरा पिकात हरभऱ्याच्या सहा ओळी आणि रबी ज्वारीच्या दोन ओळी याप्रमाणे आंतरपीक पद्धती फायदेशीर आहे.
भाजीपाला	वाढ	भाजीपाला जसे टोमाटो, वांगी, पात्ता कोबी, फुल कोबीची नर्सरी लागवड करावी व सद्यस्थितीत पालक, मेथी गाजर मुळा इतर पालेभाजीची लागवड करावी.
फळझाडे	वाढ	संत्राच्या आंबिया बाहाराची फळ तोडणी अगोदर त्यामधील ओलीत १५ दिवस अगोदर बंद करावे. संत्राच्या झाडाभवतील जागा तण विरहीत ठेवावी.
पशु / जनावरे		लम्पी स्कीनरोग सदश रोग पशुधनामध्ये दिसून येत आहे हा साथीचा विशानुजन्य रोग असून याचा प्रसार मुख्यत्त्व रक्त पिपासू चावणाऱ्या कीटकवर्गीय माशा, डास, गोचीड यामुळे होतो. याच्या व्यवस्थापणासाठी रोग बाधित पशुधन निरोगी पशुधानापासून विलगीकरण करावे. अन्यथा त्यांना एकत्रित चारावयास सोडू नये. रोग बाधित पशुधनाची ने आण बंद करावी. रोग नियंत्रणासाठी गोठा स्वच्छ ठेवावा, रक्त पिपासू चावणाऱ्या कीटकवर्गीय माशा, डास, गोचीड यांचे निर्मुलन करावे.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.